दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार , दि. १७ मार्च, २०२६ | वर्ष - १ | अंक - १७१ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

मंगळवार, दि. १७ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, फाल्गुन मास, कृष्णपक्ष, त्रयोदशी सकाळी ९-२४ पर्यंत.
दिवस नक्षत्र–शततारा रात्री (पहाटे पर्यंत) ६-०९ पर्यंत, योग– सिद्ध सकाळी ८-१५ पर्यंत
चंद्र रास- कुंभ, सूर्य रास = मीन, गुरु रास= मिथुन

### पुण्यात लो इमिशन झोन

**पुणे**: शहरातील वाढत्या वायुप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी शिवाजीनगरसह पेठ परिसरात 'लो इमिशन झोन' लागू करण्याबाबत प्रशासनाकडून विचारमंथन सुरू आहे. या क्षेत्रात जास्त प्रदूषण करणाऱ्या वाहनांना प्रवेशासाठी विशेष प्रदूषण शुल्क आकारण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात विविध तज्ज्ञ संस्था, संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक नुकतीच पार पडली.

## विधेयक विधानसभेत सादर; चर्चेवेळी मुख्यमंत्र्यांचा दावा

# धर्मस्वातंत्र्य विधेयक सर्व धर्मांसाठी एकसमान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : धर्मांतराच्या मुद्द्यावरून राज्यात वारंवार उद्भवणारी कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती आणि फसवणुकीतून होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक' हे महत्त्वपूर्ण कवच ठरणार आहे. हे विधेयक कोणत्याही एका विशिष्ट धर्माच्या विरोधात नसून, ते सर्व धर्मांना समान रीतीने लागू असेल. आमिष, फसवणूक आणि बळजबरीने होणाऱ्या धर्मांतरापासून पासून रक्षण करणे, हाच या कायद्याचा मुख्य उद्देश आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी सभागृहात या विधेयकाचे जोरदार समर्थन केले.

'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६' विधेयकाच्या माध्यमातून धर्मांतराच्या नावाखाली होणाऱ्या बेकायदेशीर कृत्यांना चाप बसणार असून, विरोधकांनी पसरवलेल्या अफवांना बाजूला सारून याकडे बघावे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. ते म्हणाले, धर्मांतराच्या वादातून दोन गट समोरासमोर येण्याचे प्रकार टाळण्यासाठी सध्याच्या कायद्यात पुरेशी स्पष्टता नाही. त्यामुळे प्रभावी (इफेक्टिव्ह) कारवाई करण्यासाठी ठोस तरतुदींची आवश्यकता होती. महाराष्ट्र हे असे विधेयक आणणारे पहिले राज्य नाही, तर १९६८ पासून आतापर्यंत देशातील १२ राज्यांनी असे कायदे केले आहेत. आम्ही केवळ नागरिकांच्या संरक्षणासाठी हे पाऊल उचलले आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान गृहराज्यमंत्री पंकज भोईर यांनी विधानसभेत धर्मस्वातंत्र्य विधेयक मांडले असून त्यावर चर्चा सुरू आहे. दरम्यान, या विधेयकाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने पाठिंबा दर्शवला असून आमदार भास्कर जाधव यांनी सभागृहात आपली भूमिका मांडली. विधेयकानुसार आमिष दाखवून, जबरदस्ती, फसवणूक, लबाडी किंवा अल्पवयीन व्यक्तीचे धर्मांतर केल्यास ते बेकायदेशीर धर्मांतर मानले जाईल. अशा प्रकारे केलेले धर्मांतर अवैध ठरेल. तसेच बेकायदेशीर धर्मांतराच्या आधारे झालेला विवाह रद्द घोषित केला जाईल. विवाहातून जन्मलेल्या मुलाबाबतही तरतूद करण्यात आली आहे. मुलाचा धर्म आईच्या पूर्वीच्या धर्मानुसार मानला जाईल, मात्र त्याला वडिलांच्या मालमत्तेवरील उत्तराधिकाराचा हक्क कायम राहील. मुलाचा ताबा आईकडे राहील आणि पोटगीसाठीही त्याला हक्क राहतील. विधेयकानुसार धर्मांतर करण्यापूर्वी प्रशासनाला माहिती न दिल्यास तेही बेकायदेशीर ठरेल. रक्ताच्या नात्यातील कोणत्याही नातेवाईकाला याबाबत तक्रार दाखल करता येईल. तसेच पोलिसांना स्वतःहून (सुओ मोटू) गुन्हा नोंदवण्याचा अधिकार देण्यात येणार आहे.

या गुन्ह्यासाठी कमाल ७ वर्षांपर्यंत कारावास आणि १ लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. अल्पवयीन, महिला किंवा अनुसूचित जाती-जमातीतील व्यक्तींच्या बाबतीत गुन्हा केल्यास ७ वर्षांपर्यंत कारावास आणि ५ लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. सामूहिक स्वरूपात गुन्हा केल्यासही कठोर शिक्षा देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

## राज्यसभा निवडणुकीत क्रॉस-व्होटिंगचे आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : देशातील १० राज्यांमधील ३७ जागांसाठी सोमवारी झालेल्या राज्यसभा द्वैवार्षिक निवडणुकीदरम्यान काही ठिकाणी गोंधळ, अनियमिततेचे आरोप, आमदारांची गैरहजेरी आणि क्रॉस-व्होटिंगच्या घटना समोर आल्या. या निवडणुकीत २६ उमेदवार बिनविरोध निवडून आले, तर उर्वरित ११ जागांसाठी मतदान झाले. या जागांमध्ये बिहारमधील पाच, ओडिशामधील चार आणि हरियाणामधील दोन जागांचा समावेश होता.

बिहारमध्ये सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीने राज्यसभेच्या पाच जागांवर सहज विजय मिळवल्याचे वृत्त आहे. उमेदवारांमध्ये मुख्यमंत्री नितीश कुमार आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांचा समावेश होता. सूत्रांच्या माहितीनुसार, एनडीएशी संबंधित सर्व २०२ आमदारांनी मतदानात भाग घेतला. यामध्ये जनता दल (युनायटेड), लोक जनशक्ती पार्टी (रामविलास), हिंदुस्थानी अवाम मोर्चा आणि राष्ट्रीय लोक मोर्चा या पक्षांचा समावेश होता.

ओडिशामध्ये चार जागांसाठी झालेल्या मतदानात क्रॉस-व्होटिंग झाल्याचे आरोप झाले. काँग्रेसचे आमदार रमेश जेना, दासरथी गोमांगो आणि सोफिया फिरदौस यांच्यासह काही विरोधी आमदारांनी भाजप समर्थित अपक्ष उमेदवार दिलीप रे यांना मतदान केल्याचा आरोप आहे.

बीजू जनता दलचे आमदार देवी रंजन त्रिपाठी यांनीही दिलीप रे यांना मतदान केल्याचे सांगितले. त्यांनी हा निर्णय बिजू पटनायक यांच्या वारशाच्या अनुरूप असल्याचे म्हटले.

## सारांश वृत्त

### भिवंडीमध्ये ८४ सिलिंडर जप्त

**ठाणे** : ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहरातील एका खाजगी जागेतून २.२२ लाख रुपये किमतीचे ८४ बेकायदेशीरपणे साठवलेले एलपीजी सिलिंडर जप्त करण्यात आले असून, तीन जणांविरुद्ध जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे पोलिसांनी सोमवारी सांगितले. घरगुती गॅस सिलिंडरची साठवणूक आणि काळाबाजार रोखण्यासाठी वाढत्या दक्षतेच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली आहे.

### बासमतीच्या निर्यातीत २ टक्के वाढीचा अंदाज

**मुंबई** : पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवरही भारताच्या बासमती तांदळाच्या निर्यातीत स्थिर वाढ होण्याची शक्यता असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. क्रिसिल रेटिंग्जने सोमवारी प्रसिद्ध केलेल्या अहवालात ही माहिती देण्यात आली. चालू आणि पुढील आर्थिक वर्षात बासमती तांदळाची निर्यात २०२४–२५ मध्ये नोंदवलेल्या ६.०६ दशलक्ष टनांच्या तुलनेत सुमारे २ टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे. मध्यपूर्वेतील संघर्षामुळे काही बाजारपेठांवर परिणाम होऊ शकतो. मात्र एकूण निर्यात स्थिर राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

### महामार्गावर गॅस टँकर उलटला

**कासगंज (उत्तरप्रदेश)** : सोमवारी मथुरा-कासगंज-बरेली महामार्गावरील वाहतूक थांबवण्यात आली. येथील नागला डुकरियाजवळ १८ टन वजनाचा गॅसने भरलेला कॅप्सूल टँकर उलटल्याने गॅस गळतीची शक्यता निर्माण झाली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. गुजरातहून बरेलीला जाणारा हा टँकर रस्त्याच्या खराब स्थितीमुळे नियंत्रणाबाहेर गेला आणि महामार्गावर उलटला, त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून अधिकाऱ्यांनी दोन्ही कॅरेजवेवरील वाहनांची वाहतूक थांबवली.

## गॅस सिलिंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी धडक मोहीम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : मध्य-पूर्व आशियातील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील एलपीजी गॅसचा पुरवठा विस्कळीत होऊ नये आणि काळाबाजार रोखता यावा यासाठी राज्य सरकारने कडक उपाययोजना सुरू केल्या आहेत. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी विधानसभेत ही माहिती दिली.

राज्यात गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष दक्षता पथके तैनात करण्यात आली आहेत. जानेवारी २०२६ ते १५ मार्च २०२६ या कालावधीत राज्यभरात २,१२९ ठिकाणी तपासण्या करण्यात आल्या. या मोहिमेत १,२०८ अवैध गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले असून त्यांची बाजारमूल्य सुमारे ३३ लाख ६६ हजार ४११ रुपये आहे.

या कारवाईदरम्यान प्रशासनाने २३ गुन्हे दाखल केले असून १८ जणांना अटक करण्यात आली आहे. सरकारच्या या कारवाईमुळे गॅसचा काळाबाजार करणाऱ्यांवर मोठा दबाव निर्माण झाला असल्याचेही सांगण्यात आले.

दरम्यान, केंद्र सरकारने ७ मार्चपासून घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतीत वाढ केली असून तो आता ९१२.५० रुपयांना उपलब्ध आहे.

पुरवठा सुरळीत राहावा यासाठी रिफायनरीमधील उत्पादन ९,००० मेट्रिक टनांवरून ११,००० मेट्रिक टनांपर्यंत वाढवण्यात आले आहे. तसेच रुग्णालये, अनाथालये आणि संरक्षण क्षेत्र यांसारख्या प्राधान्य क्षेत्रांना शंभर टक्के गॅस पुरवठा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## अनुसूचित जाती-जमातींच्या योजनांतील निधी वळवण्याच्या निर्णयावर संताप

# नमो शेतकरीसाठी मागासवर्गीयांच्या निधीला कात्री?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यात विविध कल्याणकारी योजनांचा आर्थिक भार वाढत असताना सरकारला निधीची जुळवाजुळव करण्यासाठी नवे मार्ग शोधावे लागत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महत्त्वाकांक्षी नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेसाठी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेल्या निधीचा काही हिस्सा वापरण्याचा निर्णय घेतल्याचे समोर आले आहे. या निर्णयामुळे सामाजिक क्षेत्रात तीव्र नाराजी व्यक्त होत असून मागासवर्गीयांच्या हक्काच्या निधीवर कात्री चालवल्याचा आरोप विविध संघटनांकडून करण्यात येत आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत देण्यासाठी जून २०२३ मध्ये नमो शेतकरी महासन्मान निधी योजना सुरू करण्यात आली. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या धर्तीवर राबविण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत राज्यातील सुमारे ९० लाख शेतकऱ्यांना वर्षभरात हप्त्यांद्वारे ६ हजार रुपये देण्यात येतात. सुरुवातीला या योजनेचा संपूर्ण आर्थिक भार कृषी विभागावर होता. मात्र लाभार्थ्यांची संख्या मोठी असल्याने आणि खर्च सातत्याने वाढत असल्याने सरकारसमोर निधी व्यवस्थापनाचे आव्हान निर्माण झाले आहे.

२०२४-२५ या आर्थिक वर्षात या योजनेसाठी सुमारे ४,०६३.७ कोटी रुपये खर्च झाले होते. मात्र २०२५-२६ या आर्थिक वर्षात हा खर्च वाढून सुमारे ६,०६० कोटी रुपयांपर्यंत जाण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. वाढत्या आर्थिक ताणाच्या पार्श्वभूमीवर सरकारने २०२६-२७ या आर्थिक वर्षापासून निधी वाटपाचे नवे गणित आखण्याचा निर्णय घेतला आहे. या नव्या नियोजनानुसार कृषी विभागाने या योजनेसाठी ४,७८७.४० कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केली आहे. उर्वरित निधी इतर योजनांमधून उपलब्ध करून देण्याचे ठरवण्यात आले असून त्यामध्ये अनुसूचित जाती उपयोजनेतून ६९६.९० कोटी रुपये आणि अनुसूचित जमाती उपयोजनेतून ५७५.७० कोटी रुपये देण्याचा प्रस्ताव आहे.

मात्र या निर्णयामुळे सामाजिक क्षेत्रात असंतोष निर्माण झाला आहे. अनुसूचित जाती आणि जमातींसाठी राखीव असलेला निधी त्यांच्या शिक्षण, सामाजिक उन्नती आणि विकासासाठी वापरला जाणे अपेक्षित असताना तो इतर योजनांसाठी वळवला जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते आणि संघटनांकडून केला जात आहे. हा निर्णय मागासवर्गीयांच्या हक्कांवर गदा आणणारा असल्याचेही काही संघटनांचे मत आहे.

या पार्श्वभूमीवर काही सामाजिक संघटना सरकारच्या या निर्णयाविरोधात आंदोलनाची तयारी करत असल्याची माहिती आहे. सरकारने तातडीने हा निर्णय मागे घ्यावा आणि अनुसूचित जाती-जमातींसाठी राखीव निधी त्यांच्या विकासासाठीच वापरावा, अशी मागणी या संघटनांकडून केली जात आहे.

सूत्रांच्या मते नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा लाभ अनुसूचित जाती आणि जमातींतील शेतकऱ्यांनाही मिळत असल्याने संबंधित उपयोजनांमधून निधी देणे धोरणात्मक चौकटीत बसणारे आहे. तथापि या निर्णयावरून निर्माण झालेला वाद आणि वाढती नाराजी लक्षात घेता सरकार या विषयावर कोणती भूमिका घेते, याकडे राजकीय आणि सामाजिक वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## आर्मेनियामार्गे केले सुरक्षित स्थलांतर

# इराणमधून ५५० हून अधिक भारतीयांची सुटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने इराणमधील भारतीय नागरिकांच्या सुटकेसाठी प्रयत्न वाढवले असून आतापर्यंत ५५० हून अधिक भारतीयांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आहे. या नागरिकांना इराणमधून आर्मेनियामार्गे स्थलांतरित करण्यात आले.

परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी सोमवारी आर्मेनिया सरकार आणि तेथील जनतेचे सहकार्याबद्दल आभार मानले. जमिनीमार्गे होणारी वाहतूक सुलभ केल्यामुळे भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढणे शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, तेहरानमधील भारतीय दूतावासाने या स्थलांतराचे समन्वय केले. दूतावासाने नागरिकांना सीमारेषेवर व्हिसा आणि इमिग्रेशन प्रक्रिया पूर्ण करण्यास मदत केली. याशिवाय सुमारे ९० भारतीय नागरिक अझरबैजानमध्येही दाखल झाले आहेत. आर्मेनियामध्ये पोहोचलेल्या ५५० भारतीयांपैकी २८४ जण धार्मिक कारणांसाठी इराणला गेलेले यात्रेकरू होते. त्यापैकी काही जण आधीच भारतात परतले असून उर्वरित नागरिक लवकरच परतण्याची अपेक्षा आहे. सध्या इराणमध्ये सुमारे ९,००० भारतीय नागरिक असल्याचे मंत्रालयाने सांगितले आहे. यामध्ये विद्यार्थी, नाविक, व्यापारी, व्यावसायिक आणि यात्रेकरू यांचा समावेश आहे. नागरिकांना आर्मेनिया किंवा अझरबैजानमार्गे बाहेर पडण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

परराष्ट्र मंत्रालयातील संयुक्त सचिव असीम महाजन यांनी सांगितले की पश्चिम आशियातील तणाव असूनही अनेक देशांमधून भारताकडे उड्डाणे सुरू आहेत. सौदी अरेबिया आणि ओमानमधून भारतातील विविध शहरांकडे नियमित उड्डाणे सुरू आहेत, तर कतारचे हवाई क्षेत्र अंशतः खुले आहे. कुवेतचे हवाई क्षेत्र २८ फेब्रुवारी २०२६ पासून बंद आहे. बहरीन आणि इराकमध्ये हवाई क्षेत्र बंद असल्याने तेथील भारतीय नागरिकांना सौदी अरेबियामार्गे बाहेर काढण्याची व्यवस्था केली जात आहे.

### बंगालसाठी भाजपची पहिली यादी जाहीर

**कोलकाता** : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षने १४४ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. राज्यात एकूण २९४ विधानसभा जागा आहेत. विरोधी पक्षनेते शुभेंदू अधिकारी यांनाही उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांना भवानीपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आले आहे. तसेच माजी प्रदेशाध्यक्ष दिलीप घोष यांना खरगपूर सदर मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. भाजपने जाहीर केलेल्या १४४ उमेदवारांच्या यादीत केवळ ११ महिला उमेदवारांना संधी देण्यात आली आहे.

## उजनी जलाशय पर्यटनावर लवकरच तोडगा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : सोलापूर जिल्ह्यातील उजनी जलाशय परिसरातील पर्यटन विकास प्रकल्पाबाबत निर्माण झालेल्या प्रशासकीय प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती पर्यटन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी विधानसभेत दिली.

विधानसभेत अभिजित पाटील यांनी लक्षवेधी सूचना मांडत उजनी जलाशय परिसरातील पर्यटन विकासासाठी सुमारे २८२.७५ कोटी रुपयांच्या आराखड्याला प्रशासकीय मान्यता मिळूनही प्रत्यक्ष काम सुरू झाले नसल्याचा मुद्दा उपस्थित केला. या चर्चेत समाधान आवताडे यांनीही सहभाग घेतला. यावर उत्तर देताना जयस्वाल म्हणाले की, ३० सप्टेंबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार या प्रकल्पासाठी सुमारे २८५.७५ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. तसेच अर्थसंकल्पात या प्रकल्पासाठी १०० कोटी रुपयांची तरतूदही करण्यात आली आहे.

या प्रकल्पात जल पर्यटन, कृषी पर्यटन, विनयार्ड पर्यटन आणि धार्मिक पर्यटन अशा चार घटकांचा समावेश करण्यात आला आहे. यापैकी कृषी, विनयार्ड आणि धार्मिक पर्यटनाच्या कामांना कोणतीही अडचण नसून जल पर्यटनाच्या बाबतीत काही प्रशासकीय समन्वयाची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. उजनी धरण हे जलसंपदा विभाग यांच्या मालकीचे असल्यामुळे जल पर्यटनाशी संबंधित कामांसाठी त्या विभागाची ना हरकत आवश्यक आहे. त्यामुळे पर्यटन विभाग आणि जलसंपदा विभाग यांच्यात समन्वय साधून काही प्रकल्प जलसंपदा विभागामार्फत तर काही पर्यटन विभागामार्फत राबविण्याचा निर्णय घेतला जाणार असल्याचे जयस्वाल यांनी स्पष्ट केले.

## धार्मिक स्वातंत्र्याबाबत गंभीर चिंता व्यक्त करत

# अमेरिकी आयोगाची शिफारस; संघ, 'रॉ'वर निर्बंधांचा प्रस्ताव

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य आयोगाने भारतातील धार्मिक स्वातंत्र्याबाबत गंभीर चिंता व्यक्त करत अमेरिकन प्रशासनाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारताची गुप्तचर संस्था रॉ यांच्यावर लक्षित निर्बंध लादण्याची शिफारस केली आहे. आयोगाने भारताला धार्मिक स्वातंत्र्याच्या बाबतीत "विशेष चिंतेचा देश" म्हणून घोषित करण्याची मागणीही केली आहे. यूएस कमिशन ऑन इंटरनॅशनल रिलिजियस फ्रीडमने आपल्या वार्षिक अहवालात भारतातील धार्मिक स्वातंत्र्याची स्थिती सतत खालावत असल्याचा आरोप केला आहे. या अहवालात धार्मिक अल्पसंख्याकांवरील हल्ले, प्रार्थनास्थळांवरचे हल्ले तसेच काही राज्यांतील धर्मांतरविरोधी कायद्यांबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे.
अहवालानुसार, अनेक राज्यांनी धर्मांतरविरोधी कायदे लागू करण्याचा प्रयत्न केला असून या कायद्यांमुळे दोषींना कठोर शिक्षा होऊ शकते. तसेच धार्मिक निर्वासित आणि अल्पसंख्याकांविरोधात कारवाईची शक्यता वाढल्याचा आरोपही आयोगाने केला आहे.
काही ठिकाणी जमावाकडून अल्पसंख्याक समुदायांवर हल्ल्यांच्या घटना वाढल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.
आयोगाने भारत सरकारने केलेल्या वक्फ सुधारणा कायद्यावरही टीका केली आहे. इस्लामिक धर्मादाय मालमत्तांचे नियमन आणि व्यवस्थापन बदलण्यासाठी हा कायदा आणण्यात आला होता. याशिवाय उत्तराखंड सरकारच्या अल्पसंख्याक शिक्षण प्राधिकरणाशी संबंधित कायद्याचाही अहवालात उल्लेख करण्यात आला आहे. अहवालात महाराष्ट्र, ओडिशा आणि उत्तर प्रदेश येथे झालेल्या काही जातीय तणावाच्या घटनांचाही संदर्भ देण्यात आला असून काही संघटनांवर आरोप करण्यात आले आहेत.
आयोगाने अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्या प्रशासनाला भारताशी संबंधित शस्त्रास्त्र विक्री आणि व्यापार धोरणांवर पुनर्विचार करण्याचीही शिफारस केली आहे. भारत सरकारने मात्र या नव्या अहवालावर अद्याप अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही.
दरम्यान, भारताचे परराष्ट्र मंत्रालय यापूर्वी अशा अहवालांना पक्षपाती आणि राजकीय हेतूने प्रेरित असल्याची टीका करत आले आहे.
२०२५ मधील अहवालावर प्रतिक्रिया देताना मंत्रालयाने अशा अहवालांमध्ये भारतातील काही घटनांचे अतिशयोक्तीकरण करून देशाच्या विविधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे म्हटले होते.
१९९८ मध्ये अमेरिकन काँग्रेसच्या कायद्याने स्थापन झालेला हा आयोग जगभरातील धार्मिक स्वातंत्र्याच्या परिस्थितीवर अभ्यास करून अमेरिकन सरकार आणि काँग्रेसला शिफारसी सादर करतो.

## पुणे जिल्ह्यात एफआरपीचे ४०१ कोटी रुपये थकीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : जिल्ह्यातील साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांच्या उसाच्या रास्त आणि किफायतशीर किमतीपोटी देय असलेल्या रकमेपैकी मोठा हिस्सा अदा करण्यात आला असला तरी सुमारे ४०१ कोटी रुपयांची एफआरपी अद्याप थकीत आहे. ही माहिती साखर आयुक्तालय यांनी दिलेल्या अहवालातून समोर आली आहे.

२०२५-२६ हंगामात पुणे जिल्ह्यातील साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांना एकूण ४ हजार ४८९ कोटी १४ लाख रुपये एफआरपी देय आहेत. त्यापैकी २८ फेब्रुवारीअखेरपर्यंत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ३ हजार ९७५ कोटी ५ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. त्यामुळे सुमारे ४०१ कोटी ८५ लाख रुपये इतकी रक्कम अद्याप थकीत असल्याचे स्पष्ट झाले आहे. अहवालानुसार काही साखर कारखान्यांनी देय एफआरपीपेक्षा अधिक रक्कमही शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केली आहे. ही अतिरिक्त रक्कम साधारण ३२ कोटी रुपयांच्या आसपास असल्याचे दिसून येते.

जिल्ह्यातील १५ साखर कारखान्यांपैकी सध्या ६ कारखान्यांनी एफआरपीची शंभर टक्के रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली आहे. मात्र काही कारखान्यांकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे. दौंड तालुक्यातील भीमा सहकारी साखर कारखाना येथे सर्वाधिक थकबाकी असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

## संपादकीय

# स्थलांतराचे आरसे



**केरळचे विकास मॉडेल अनेकदा आदर्श म्हणून मांडले जाते. पण त्या मॉडेलची खरी ताकद ही बाहेरून आलेले स्थलांतरित कामगार आहेत. त्यांच्याशिवाय केरळची अर्थव्यवस्था चालत नाही. तरीही त्यांच्याबाबतची सामाजिक अस्वस्थता वाढताना दिसते. ही विसंगती भारताचा आरसा ठरते.**

केरळ हे भारतातील एक विलक्षण राज्य मानले जाते. उच्च साक्षरता, उत्तम आरोग्य व्यवस्था, सामाजिक प्रगती यामुळे ते अनेकदा विकासाच्या चर्चेत आदर्श म्हणून पुढे केले जाते. पण या कथेत एक महत्त्वाचा भाग बराच काळ दुर्लक्षित राहिला. तो म्हणजे बाहेरून आलेल्या स्थलांतरित कामगारांचा. आज केरळच्या अर्थव्यवस्थेचा पाया मोठ्या प्रमाणावर या स्थलांतरितांवर उभा आहे. अंदाजे ३० ते ३५ लाखांहून अधिक आंतरराज्यीय कामगार केरळमध्ये काम करतात आणि ही संख्या पुढील दशकात आणखी वाढण्याची शक्यता आहे. म्हणजेच राज्याच्या कामगार शक्तीचा मोठा हिस्सा हे परप्रांतीय आहेत. बांधकाम, मासेमारी, उत्पादन, सेवा क्षेत्र अशा जवळपास प्रत्येक उद्योगात त्यांचे अस्तित्व निर्णायक झाले आहे. या मागे कारणेही स्पष्ट आहेत. केरळची लोकसंख्या वृद्ध होत चालली आहे आणि तरुण पिढी मोठ्या प्रमाणावर परदेशात नोकरीसाठी जात आहे. परिणामी स्थानिक कामगारांची कमतरता निर्माण झाली. त्या रिकाम्या जागेत बिहार, पश्चिम बंगाल, ओडिशा, आसाम अशा राज्यांतील गरीब कुटुंबांतील युवक आले. त्यांच्यासाठी केरळ म्हणजे भारतातील छोटा 'दुबई' मानला जातो. कारण येथे मिळणारे वेतन त्यांच्या मूळ राज्यांच्या तुलनेत अधिक असते. उदाहरणार्थ अनेक कामगारांना रोज ८०० ते १२०० रुपये मिळतात, जे त्यांच्या राज्यांतील वेतनापेक्षा लक्षणीय जास्त असते. त्यामुळे ते आपल्या उत्पन्नाचा मोठा भाग घरी पाठवतात. काही अभ्यासांनुसार स्थलांतरित कामगार त्यांच्या कमाईपैकी सुमारे तीन चतुर्थांश रक्कम आपल्या गावाकडे पाठवतात. म्हणजे केरळची अर्थव्यवस्था आणि भारतातील अनेक गरीब जिल्ह्यांची अर्थव्यवस्था या स्थलांतराच्या एका अदृश्य धाग्याने जोडल्या गेल्या आहेत. केरळमध्ये कमावलेले पैसे ओडिशा किंवा बंगालच्या गावांमध्ये घरे उभी करतात. आर्थिक गरज आणि सामाजिक स्वीकार यामध्ये अनेकदा दरी असते. केरळमध्ये स्थलांतरित कामगारांना काम मिळते, परंतु त्यांचे जीवन अनेकदा असुरक्षित असते. अनेकजण गर्दीच्या खोल्यांत राहतात, सामाजिक सुरक्षा मर्यादित असते आणि भाषेची अडचणही कायम असते. त्याहून महत्त्वाचे म्हणजे सामाजिक संशयाची भावना वाढताना दिसते. काही गुन्हेगारी घटनांनंतर स्थलांतरित कामगारांवर संशय घेतला जातो. कधी कधी अफवांमुळे हिंसक प्रतिक्रिया देखील घडतात. अशा काही घटनांनी केरळसारख्या प्रगत समाजातही परप्रांतीयांविषयी असलेली अस्वस्थता उघड केली. एकीकडे स्थलांतरितांशिवाय उद्योग चालत नाहीत. दुसरीकडे त्यांना पूर्ण सामाजिक स्वीकार मिळत नाही. अर्थव्यवस्था त्यांच्यावर अवलंबून असते, पण समाज त्यांना पूर्णपणे आपले मानत नाही. केरळने या समस्येकडे काही प्रमाणात सकारात्मक दृष्टीने पाहण्याचा प्रयत्न केला आहे. केरळ सरकारने स्थलांतरितांना 'गेस्ट वर्कर्स' असे संबोधण्याची पद्धत सुरू केली. त्यांच्यासाठी विमा योजना, आरोग्य सुविधा आणि नोंदणी व्यवस्था यांसारख्या उपाययोजना राबवण्यात आल्या. भारतातील इतर अनेक राज्यांच्या तुलनेत ही भूमिका अधिक समावेशक मानली जाते. कारण स्थलांतर हा समाजाच्या मानसिकतेचा विषय आहे. स्थानिक लोकसंख्या कमी होत असताना बाहेरून येणाऱ्या कामगारांची संख्या वाढत आहे. त्यामुळे सामाजिक रचनेत बदल होणे अपरिहार्य आहे. यात आणखी एक व्यापक संदर्भ आहे. भारतातील आर्थिक असमानतेचा. केरळमध्ये येणारे बहुतांश स्थलांतरित हे देशातील सर्वांत गरीब प्रदेशांतून येतात. त्यांच्या स्थलांतरामागे बेरोजगारी, कमी वेतन आणि संधींचा अभाव ही कारणे आहेत. त्यामुळे केरळचे उदाहरण प्रत्यक्षात भारतातील प्रादेशिक विषमतेचेही चित्र दाखवते. केरळची कथा म्हणूनच फक्त एका राज्याची कथा नाही. ती भारतातील अंतर्गत स्थलांतराची कथा आहे. विकास ज्या प्रदेशांत वेगाने होतो तिथे कामगारांची मागणी वाढते. आणि जिथे संधी कमी असतात तिथून लोक स्थलांतर करतात. ही आर्थिक प्रक्रिया नैसर्गिक असली तरी तिचे सामाजिक परिणाम गुंतागुंतीचे असतात. केरळसमोरचा खरा प्रश्न समावेशक विकासाचा आहे. स्थलांतरितांकडे स्वस्त मजूर म्हणून पाहायचे की समाजाचा एक भाग म्हणून स्वीकारायचे, हा निर्णय तेथील समाजालाच घ्यावा लागेल. केरळची अर्थव्यवस्था आज या स्थलांतरितांवर उभी आहे. उद्या त्यांची संख्या कमी झाली, तर अनेक उद्योग थांबू शकतात. त्यामुळे त्यांच्याविषयीचा दृष्टिकोन बदलणे ही केवळ नैतिक गरज नाही, तर आर्थिकही गरज आहे. केरळचे मॉडेल अनेकदा जगाला दाखवले जाते. पण त्या मॉडेलचे खरे यश तेव्हाच ठरेल जेव्हा विकासाच्या या कथेत स्थलांतरित कामगारही समान सन्मानाने सामील होतील. अन्यथा केरळची प्रगती ही केवळ एका समाजाची कथा राहील, सर्वांच्या सहभागाची नाही.

# बंगालमधील मतदार यादीचे राजकारण

पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकांची अधिकृत घोषणा होताच राजकीय वातावरण अचानक तापले. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार राज्यातील २९४ जागांसाठी मतदान २३ आणि २९ एप्रिल या दोन टप्प्यांत होणार असून निकाल ४ मे रोजी जाहीर होणार आहेत. या निवडणुकीत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा चौथ्या कार्यकाळाचा प्रयत्न आणि भारतीय जनता पक्षाचा सत्तेपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न असा स्पष्ट द्वंद्व दिसणार आहे. परंतु या निवडणुकीची खरी पार्श्वभूमी ही निव्वळ राजकीय नाही; तर ती मतदार यादीभोवती निर्माण झालेल्या वादाने आकारलेली आहे.

या वादाचा केंद्रबिंदू आहे 'स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन' म्हणजेच एसआयआर. निवडणूक आयोगाने मतदार यादीतील त्रुटी दूर करण्यासाठी ही व्यापक पुनरावलोकन प्रक्रिया राबवली. स्थलांतर, मृत्यू, दुबार नोंदी किंवा अपात्र व्यक्तींची नावे काढून टाकण्यासाठी अशी प्रक्रिया केली जाते, असे आयोगाचे म्हणणे आहे. तत्त्वतः या प्रक्रियेला विरोध असण्याचे कारण नाही. उलट अचूक मतदार यादी ही कोणत्याही लोकशाहीची मूलभूत गरज आहे. मात्र, बंगालमध्ये ही प्रक्रिया प्रशासनिक न राहता राजकीय बनली. कारण या पुनरावलोकनात लाखो मतदारांच्या नावांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. काही अहवालांनुसार सुमारे ६० लाख मतदारांची नावे तपासणीखाली गेली किंवा यादीतून वगळली गेली. एवढ्या मोठ्या प्रमाणावर मतदार 'संशयित' ठरल्याने निवडणूक प्रक्रियेबाबत संशय निर्माण होणे स्वाभाविक होते.

या वादाचे राजकीय परिणामही तितकेच स्पष्ट आहेत. बंगालमध्ये निवडणुका नेहमीच अत्यंत स्पर्धात्मक असतात. २०११ पासून राज्यात तृणमूल काँग्रेसचे वर्चस्व असले, तरी गेल्या दशकात भाजपने मोठी राजकीय वाढ साधली आहे. अशा परिस्थितीत काही लाख मतदारांची नावे कमी-जास्त होणेही निवडणुकीच्या निकालावर परिणाम करू शकते. त्यामुळे मतदार यादीतील बदल हा केवळ प्रशासनिक मुद्दा राहत नाही; तो थेट राजकीय प्रश्न बनतो.

या प्रक्रियेवर विरोधकांनी गंभीर आक्षेप घेतले. काही




**» लोकशाहीत निवडणूक हा उत्सव मानला जातो; पण त्या उत्सवाचा पाया मतदार यादीवर असतो. पश्चिम बंगालमध्ये निवडणुका जाहीर होताच मतदार यादीवरील 'एसआयआर' वाद पुन्हा केंद्रस्थानी आला आहे.**

मतदारसंघांत हजारो लोकांची नावे यादीतून काढण्यात आल्याची उदाहरणे समोर आली. विशेषतः सीमावर्ती भागांतील आणि स्थलांतरित समुदायांतील मतदारांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. काही समुदायांना आपल्या नागरिकत्वाबद्दलच संशय निर्माण झाल्याची भावना व्यक्त केली गेली. यामुळे एसआयआर हा केवळ मतदार यादीचा प्रश्न न राहता ओळख आणि नागरिकत्वाच्या राजकारणाशी जोडला गेला.

या वादाला आणखी एक पैलू आहे आणि तो आहे तंत्रज्ञानाचा वाढता वापर. आज मतदार यादी तयार करताना मोठ्या प्रमाणावर डिजिटल प्रणाली आणि डेटा विश्लेषणाचा वापर केला जातो. या तंत्रज्ञानामुळे प्रक्रिया जलद आणि व्यापक बनते. परंतु त्याच वेळी त्रुटींची शक्यता वाढते. एखाद्या संगणकीय प्रक्रियेमुळे हजारो लोकांची नावे वगळली गेली, तर त्याची जबाबदारी कोणाची हा प्रश्न निर्माण होतो. लोकशाहीच्या दृष्टीने हा अत्यंत संवेदनशील मुद्दा आहे. कारण मतदानाचा अधिकार हा केवळ कायदेशीर अधिकार नसून लोकशाहीतील सहभागाचे प्रतीक आहे. एखाद्या नागरिकाचे नाव मतदार यादीतून वगळले गेले, तर तो प्रत्यक्षात लोकशाही प्रक्रियेपासून बाहेर पडतो. म्हणूनच मतदार यादी तयार करण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि विश्वासार्हता अत्यंत महत्त्वाची असते.

पश्चिम बंगालमधील निवडणूक जाहीर झाल्यानंतर या प्रश्नाचे महत्त्व अधिक वाढले आहे. निवडणुकीच्या काही आठवडे आधीच मतदार यादीवर वाद सुरू असल्याने संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर त्याची सावली पडली आहे. निवडणूक आयोगाने प्रशासनातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांची बदली करून निवडणूक व्यवस्थेची तटस्थता राखण्याचा प्रयत्नही केला आहे. परंतु या पावलांनी वाद पूर्णपणे शांत झालेला नाही. या परिस्थितीत एक मूलभूत प्रश्न उभा राहतो. लोकशाहीची विश्वासार्हता केवळ मतदानाच्या दिवशी सुरक्षिततेची व्यवस्था करण्याने टिकत नाही. ती मतदार यादी तयार करताना टिकते. कारण निवडणुकीचा निकाल हा शेवटी मतदारांच्या संख्येवर आणि त्यांच्या सहभागावर अवलंबून असतो.

भारतीय निवडणूक व्यवस्थेची ताकद तिच्या संस्थात्मक विश्वासार्हतेत आहे. निवडणूक आयोगाला दीर्घकाळ स्वतंत्र आणि निष्पक्ष संस्था म्हणून मान्यता मिळाली आहे. त्यामुळे मतदार यादीसारख्या संवेदनशील प्रक्रियांमध्ये आयोगाने अधिक पारदर्शकता दाखवणे आवश्यक आहे. अन्यथा संशय निर्माण होणे अपरिहार्य ठरते.

पश्चिम बंगालची ही निवडणूक भारतीय लोकशाहीच्या प्रक्रियेचीही कसोटी आहे. मतदार यादीवर विश्वास राहिला, तर निवडणुकीचा निकाल कोणताही असो लोकशाही मजबूत राहते. पण त्या यादीवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले, तर निकालापेक्षा प्रक्रियेवरचा विश्वास अधिक धोक्यात येतो. म्हणूनच बंगालमधील या निवडणुकीकडे राजकीय लढाई म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. ती प्रत्यक्षात मतदार यादीच्या विश्वासार्हतेची आणि लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांची परीक्षा आहे. बंगाल हा या परीक्षेचा पहिला मंच आहे; पण त्याचे परिणाम संपूर्ण भारतीय लोकशाहीवर उमटू शकतात.

# लोणावळा विकास आराखड्याचे पुनरावलोकन करा

## शरद पवार गटाची मागणी; सुधारित आराखड्यासाठी प्रक्रिया सुरू करा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणावळा** : पर्यटननगरी असलेल्या लोणावळा शहरासाठी लागू असलेला विद्यमान विकास आराखडा येत्या ऑगस्ट २०२६मध्ये २० वर्षांची मुदत पूर्ण करणार आहे. कायदेशीर तरतुदीनुसार या आराखड्याचे पुनरावलोकन करणे आवश्यक असतानाही अद्याप कोणतीही ठोस प्रक्रिया सुरू न झाल्याने शरद पवार गटाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नासिर शेख यांनी नगरपरिषद प्रशासनाकडे याबाबत निवेदन देत तातडीने सुधारित विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्याची मागणी केली आहे.




लोणावळा नगर परिषद हद्दीतील विद्यमान विकास आराखडा सुमारे दोन दशकांपूर्वी तयार करण्यात आला होता. शहराची लोकसंख्या, पर्यटनाचा वाढता ताण, वाढणारी बांधकामे आणि पायाभूत सुविधांची गरज लक्षात घेता आता आधुनिक व दूरदृष्टी असलेले नियोजन आवश्यक असल्याचे मत मांडण्यात आले आहे. पर्यटक आणि स्थानिक नागरिकांसाठी पार्किंग व्यवस्था, आरोग्य सुविधा, शैक्षणिक संस्था, सार्वजनिक उद्याने तसेच इतर नागरी सुविधा यांचा समावेश असलेला नवा आराखडा तयार करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे.

या संदर्भात बोलताना नासिर शेख यांनी सांगितले की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६मधील कलम ३८नुसार विद्यमान विकास आराखड्याचे २० वर्षांनंतर पुनरावलोकन करून सुधारित आराखडा तयार करणे हे नियोजन प्राधिकरणाचे बंधनकारक कर्तव्य आहे. मात्र, लोणावळा नगर परिषदेकडून अद्याप कोणतीही पारदर्शक किंवा कायदेशीर प्रक्रिया सुरू झाल्याचे दिसत नसल्याचा आरोप त्यांनी केला. शहराचे वेगाने होत असलेले नागरीकरण आणि पर्यटनाच्या वाढत्या गरजा लक्षात घेता लोणावळ्यासाठी नियोजनबद्ध विकास आराखडा तयार करणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे प्रशासनाने तातडीने विद्यमान आराखड्याचे पुनरावलोकन करून नवीन विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# वाढत्या वाहनधुरामुळे प्रदूषणाचा धोका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड शहरात वाहनांची संख्या झपाट्याने वाढत असताना प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक असलेली 'प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र' (पीयूसी) यंत्रणा अपुरी आणि प्रभावहीन ठरत असल्याचे समोर आले आहे. शहरात सुमारे २५ लाख ६१ हजार वाहनांची नोंद असताना केवळ १९३ पीयूसी केंद्रे कार्यरत आहेत. त्यामुळे वाहनांच्या धुरावर नियंत्रण ठेवणे कठीण होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

अनेक पीयूसी केंद्रे केवळ कागदावरच अस्तित्वात असल्याचे आढळते. काही केंद्रचालकांच्या नावावर एकाच वेळी चार-पाच केंद्रांची नोंद असल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष तपासणीची प्रक्रिया कमकुवत होत असून वाहनधुराचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे शहरातील वायुप्रदूषणात मोठी भर पडत आहे. वाहनधूर हा प्रदूषणाचा प्रमुख घटक ठरत असून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी पीयूसी तपासणी आवश्यक मानली जाते. मात्र, उपलब्ध केंद्रांची संख्या आणि त्यांच्या कार्यपद्धतीतील त्रुटी यामुळे ही यंत्रणा अपेक्षित परिणाम देऊ शकत नसल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

हवा प्रदूषणाचा स्तरही वाढत असल्याचे विविध अहवालांमधून स्पष्ट झाले आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपचे काँग्रेसविरोधात आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : संसदेच्या चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी आणि इतर खासदारांनी संसदेच्या 'मकर प्रवेशद्वारा'चा वापर 'पिकनिक स्पॉट'प्रमाणे केल्याचा आरोप करत पिंपरी-चिंचवड भाजपच्या वतीने आक्रमक निदर्शने करण्यात आली. शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात कार्यकर्त्यांनी काँग्रेसविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.




दिल्लीमध्ये सध्या संसदेत अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनादरम्यान काँग्रेसच्या खासदारांनी संसदेच्या मुख्य 'मकर प्रवेशद्वारा'जवळ एकत्र येऊन तेथे 'पार्लमेंट पिकनिक स्पॉट' तयार करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप भाजपने केला आहे. लोकसभा अध्यक्षांच्या निर्देशांनुसार संसद परिसरातील कोणत्याही प्रवेशद्वाराजवळ धरणे, आंदोलन किंवा निदर्शने करण्यास मनाई आहे. या नियमांचे उल्लंघन करून काँग्रेसने संसदेच्या शिष्टाचाराचा भंग केल्याचा दावा भाजपकडून करण्यात आला.

मोरवाडी येथील भाजप मध्यवर्ती कार्यालयासमोर सकाळी अकराच्या सुमारास आंदोलन करण्यात आले. यावेळी बोलताना शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे म्हणाले की, संसद हे लोकशाहीचे मंदिर असून त्याची प्रतिष्ठा राखणे सर्वांची जबाबदारी आहे. मात्र राहुल गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वैयक्तिक प्रसिद्धीसाठी या पवित्र जागेचा वापर केल्याने देशाच्या सर्वोच्च सभागृहाचा अवमान झाल्याचा आरोप त्यांनी केला.

या आंदोलनात भाजपचे पदाधिकारी, माजी महापौर, नगरसेवक तसेच विविध आघाड्यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## आमदार शंकर जगताप यांची मागणी

# रावेतच्या नव्या बंधाऱ्यासाठी १०५ कोटींचा निधी द्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेता पाणीपुरवठ्याच्या महत्त्वाच्या प्रकल्पांना गती देण्याची गरज असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी विधानमंडळात मांडले. आंद्रा धरणातून पाणी उचलण्यासाठी आवश्यक असलेल्या जमिनीचे कायमस्वरूपी हस्तांतरण करावे तसेच रावेत येथील नव्या बंधाऱ्यासाठी १०५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करावा, अशी मागणी त्यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करताना केली.



शहरातील पाणीटंचाईचा प्रश्न सोडवण्यासाठी या दोन्ही प्रकल्पांना प्राधान्य देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. या कामांमुळे भविष्यातील पाणीपुरवठा अधिक सक्षम होईल आणि शहरवासीयांना मोठा दिलासा मिळेल, असे त्यांनी सांगितले.

आमदार जगताप म्हणाले की, शहराला हक्काचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी मावळ तालुक्यातील मौजे शिरे येथील ०.९५ हेक्टर जमीन जलसंपदा विभागाकडून कायमस्वरूपी हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. या ठिकाणी जॅकवेल, अप्रोच चॅनेल, पंप हाऊस आणि सबस्टेशन उभारण्याची योजना आहे. मुख्य अभियंता (जलसंपदा) यांनी हा प्रस्ताव महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे पाठवला असून जमिनीचे मूल्यांकन व हस्तांतरण प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. या प्रक्रियेमुळे आंद्रा धरणातील पाणी शहरापर्यंत पोहोचवण्यातील तांत्रिक अडथळे दूर होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, पवना नदीवरील रावेत येथील बंधारा हा ब्रिटिशकालीन असल्याने त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात गाळ साचत आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्यावर परिणाम होत असून दररोज सुमारे ५ कोटी लिटर पाणी वाया जात असल्याची माहितीही त्यांनी दिली. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून जुन्या बंधाऱ्याऐवजी व्हर्टिकल लिफ्ट शाफ्ट तंत्रज्ञानावर आधारित आधुनिक बंधारा उभारण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

या आधुनिक बंधाऱ्यामुळे गाळ साचण्याची समस्या कमी होईल आणि पाण्याचा अपव्यय थांबेल, असे सांगत या प्रकल्पासाठी १०५ कोटी रुपयांचा सविस्तर प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला असून त्याला तातडीने मंजुरी देण्याची मागणी त्यांनी केली. या प्रकल्पांमुळे शहरातील पाणीपुरवठा अधिक सक्षम होण्याबरोबरच भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यास मदत होईल, असा विश्वास आमदार जगताप यांनी व्यक्त केला.

# पिंपरी भाजी मंडईत दर स्थिर; तोतापुरी कैरीची आवक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी येथील लालबहादूर शास्त्री भाजी मंडईत रविवारी (दि. १५) फळभाज्यांचे दर गेल्या आठवड्याच्या तुलनेत बहुतांश स्थिर राहिल्याचे दिसून आले. बाजारात उन्हाळ्याची चाहूल लागल्याने तोतापुरी कैरीची आवक सुरू झाली असून लिंबाच्या दरात मात्र वाढ झाली आहे. इतर बहुतांश फळभाज्या व पालेभाज्यांचे दर स्थिर असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

बाजारात तोतापुरी कैरी सुमारे १०० रुपये किलो दराने उपलब्ध होती, तर वाढत्या उष्णतेमुळे लिंबू १२० रुपये किलो दराने विकले जात होते. वाटाणा आणि गाजर यांचे दर नेहमीप्रमाणे ३० ते ४० रुपये किलो होते. गवारीची आवक कमी झाल्याचेही विक्रेत्यांनी सांगितले. पालेभाज्यांमध्ये कोथिंबीर, मेथी, शेपू आणि पालक या भाज्या २० रुपये प्रति जुडी दराने उपलब्ध होत्या.

फळभाज्यांमध्ये गवार १२० रुपये किलो, शेवगा ९० रुपये, भेंडी ६० रुपये, टोमॅटो २५ रुपये, फ्लॉवर ३० रुपये, कोबी ३० रुपये, मिरची ८० ते १०० रुपये, गाजर ३० रुपये, शिमला मिरची ६० रुपये, वांगी ८० रुपये, काकडी ३० रुपये, कारले ७० रुपये, बटाटा २५ ते ३० रुपये, बिन्स ७० रुपये, पावटा ६० रुपये, भोपळा ३० रुपये, दोडका ७० रुपये, तोंडली ५० रुपये, बीट ३० रुपये, दुधी भोपळा ५० रुपये आणि घेवडा ६० रुपये किलो दराने विक्री होत होती.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### दुचाकीवरील आजोबा व नातीचा मृत्यू

**पुणे** : जिल्ह्यातील भोर तालुक्यात झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील आजोबा आणि त्यांच्या नऊ वर्षांच्या नातीचा दुर्दैवी मृत्यू झाला. हा अपघात हातवे-तांभाड रस्त्यावर देऊळवाडीजवळ शनिवारी घडला. मृत्यू झालेल्यांची नावे शिवाजी नामदेव शिळीमकर (वय ६९) आणि तन्वी नितीन शिळीमकर (वय ९) अशी आहेत. दोघेही पुण्यातील आंबेगाव रोड परिसरात राहत होते. त्यांचे मूळ गाव तांभाड असल्याची माहिती पोलिसांनी दिली. शिळीमकर आजोबा आपल्या नातीसह दुचाकीवरून जात असताना भरधाव डंपरने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या धडकेत दोघांनाही गंभीर दुखापत झाली. स्थानिकांनी त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी राजगड पोलीस ठाण्यात डंपर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आकाश शिवाजी भुसने (रा. उबाळेनगर, वाघोली) असे आरोपी चालकाचे नाव असून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. पुढील तपास राजगड पोलीस करत आहेत.




### गावठी पिस्तुलांसह तिघांना अटक

**शिरूर** : अवैध गावठी पिस्तुल बाळगणाऱ्या आरोपींविरुद्ध शिरूर पोलिसांनी धडक कारवाई करत तीन जणांना अटक केली. आरोपींकडून दोन गावठी बनावटीची पिस्तुले, सहा जिवंत काडतुसे तसेच एक फोर्ड फिगो कार आणि एक पल्सर मोटारसायकल असा सुमारे ३ लाख ४५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. निमोणे येथील नागेश्वर विद्यालयासमोर पांढऱ्या रंगाच्या फोर्ड फिगो कारमध्ये काही इसम गावठी पिस्तुल आणि जिवंत काडतुसे घेऊन थांबले आहेत, अशी माहिती मिळाल्यानंतर, पोलिसांनी तिघांनाही ताब्यात घेत त्यांच्या विरोधात शिरूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आरोपींकडील एकूण ३ लाख ४५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

---

### माऊली मंदिरात पुष्पसजावट, इंद्रायणी घाटावर आरती

# एकादशी निमित्त आळंदीत भाविकांची गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी** : भागवत एकादशी (पापमोचनी) निमित्त आळंदीतील माऊली मंदिरात रविवारी भाविकांनी मोठी गर्दी केली. दिवसभर धार्मिक कार्यक्रमांच्या वातावरणात एकादशी उत्साहात साजरी झाली. सुमारे पन्नास हजारांहून अधिक भाविकांनी श्रींचे दर्शन घेतले. मंदिरातील गाभाऱ्यात करण्यात आलेली आकर्षक पुष्पसजावट भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत होती.

एकादशी निमित्त पहाटे वेदमंत्रांच्या जयघोषात पवमान अभिषेक करण्यात आला. त्यानंतर दिवसभर पूजा, आरती, फराळाचा महानैवेद्य आणि कीर्तन सेवा आदी धार्मिक कार्यक्रम पार पडले. वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने देहूकर यांच्या कीर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी हरिनामाच्या गजरात मंदिर प्रदक्षिणा व नगरप्रदक्षिणा करत श्रींचे दर्शन घेतले. दर्शनापूर्वी अनेक भाविकांनी इंद्रायणी नदी घाटावर स्नानासाठीही गर्दी केली.

इंद्रायणी नदी घाटावर महिलांसह भाविकांनी उत्साहात इंद्रायणीची आरती केली. इंद्रायणी आरती सेवा समिती, आळंदी देवस्थान, आळंदी नगरपरिषद, देहू-आळंदी परिसर विकास समिती तसेच विविध सामाजिक संस्थांच्या वतीने स्वतंत्र आरतीचे आयोजन करण्यात आले. सकाळी नगरपरिषदेच्या वतीने घाट परिसराची स्वच्छता करण्यात आली.

मंदिरातील भाविकांना सुरळीत दर्शन मिळावे यासाठी व्यवस्थापक माऊली वीर, उपव्यवस्थापक तुकाराम माने यांच्यासह देवस्थानचे कर्मचारी, सेवक, सुरक्षा रक्षक आणि पोलिसांनी विशेष नियोजन केले. आळंदी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी. एस. नरके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला. आळंदी-दिघी वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियोजन केले.

दरम्यान, दुचाकी वाहनांवर मोठ्या प्रमाणात करण्यात येत असलेल्या दंडात्मक कारवाईबाबत काही भाविकांनी नाराजी व्यक्त केली. पार्किंगची पुरेशी व्यवस्था करून त्यानंतरच कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी इंद्रायणी नदीचे पावित्र्य राखण्यासाठी आणि प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणीही सामाजिक संस्थांनी केली. पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याकडे यासंदर्भात निवेदन देण्यात आले आहे.

---

# शेतातील विद्युत डीपी व खांब हलविण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्यातील खडकवाडी येथील शेतकरी पांडुरंग महादू वाळूंज यांनी त्यांच्या शेतातील विद्युत डीपी व खांब तातडीने हलविण्याची मागणी महावितरणकडे केली आहे. सुरक्षिततेच्या कारणास्तव ही मागणी करण्यात आली असून याबाबत त्यांनी लेखी अर्जही सादर केला आहे.

खडकवाडी गावाच्या हद्दीतील मुळूकवस्ती येथे राहणारे वाळूंज यांच्या घराजवळच महावितरणची डीपी आणि विद्युत खांब उभारलेले आहेत.

हे दोन्ही त्यांच्या खाजगी शेतजमिनीत असल्याचे त्यांनी सांगितले. दोन खांबांदरम्यानच्या विद्युत तारा अत्यंत खाली लोंबकळत असल्याने कुटुंबीयांना अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. विशेषतः पावसाळ्यात जोरदार वारा किंवा वादळ झाल्यास शॉर्टसर्किट होऊन मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता असल्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर शेतातील विद्युत डीपी व खांब सुरक्षित ठिकाणी हलवावेत, तसेच लोंबकळणाऱ्या तारांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी वाळूंज यांनी केली आहे. तसेच त्यांच्या जमिनीचा काही भाग महावितरणने वापरल्यामुळे शासकीय नियमांनुसार नुकसानभरपाई देण्यात यावी, असेही त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

मात्र, अर्ज करून साडेचार ते पाच महिने उलटूनही महावितरणकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, असा आरोप वाळूंज यांनी केला.

येत्या पंधरा दिवसांत याबाबत योग्य निर्णय न घेतल्यास लोणी येथील महावितरण कार्यालयासमोर कुटुंबासह उपोषणाला बसण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

दरम्यान, या संदर्भात लोणी येथील महावितरणचे कनिष्ठ अभियंता यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून योग्य निर्णय घेतला जाईल, असे सांगितले.

---

# आई-वडिलांची सेवा हाच खरा परमार्थ



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्यातील वडगावपीर येथे दिवंगत सामाजिक कार्यकर्ते व तंटामुक्त गाव समितीचे माजी अध्यक्ष पै. विठ्ठलदादा किसन राजगुडे यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या निमित्त उद्योजक तानाजी राजगुडे व विठ्ठल परिवारातर्फे ह.भ.प. कबीर महाराज आत्तार यांची कीर्तन सेवा आयोजित करण्यात आली. यावेळी कीर्तनात बोलताना कबीर महाराज आत्तार यांनी आई-वडिलांची सेवा हाच खरा धर्म व परमार्थ असल्याचे प्रतिपादन केले.

राजगुडे परिवाराने वडगावपीर गावाच्या विकासासाठी आणि सामाजिक कार्यासाठी मोठे योगदान दिले आहे. त्याच पार्श्वभूमीवर विठ्ठलदादा राजगुडे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त गावात विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

श्री पीरसाहेबांच्या यात्रेनिमित्त निकाली कुस्त्यांचाही मोठ्या प्रमाणावर आखाडा भरविण्यात आला. या स्पर्धेसाठी अहिल्यानगर, सातारा, कोल्हापूर तसेच पुणे जिल्ह्यातील नामांकित पैलवान सहभागी झाले होते. रंगतदार आणि डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या अनेक कुस्त्या पार पडल्या. विजेत्या पैलवानांना १०१ रुपयांपासून ते ११,१११ रुपयांपर्यंतची बक्षिसे देण्यात आली. पंच म्हणून विजय आदक, विकास आदक, दिनकर आदक, विजय राजगुडे, विशाल आदक आणि नानाभाऊ मांदळे यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाला अखिल भारतीय सेनेच्या महिला अध्यक्षा आशाताई अरुणभाई गवळी, जिल्हा परिषद सदस्य विवेक वळसे पाटील, अभिजीतराजे खाणविलकर, डी. रावजी, उद्योगपती विजय गायकवाड, सुनील वाडकर, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष देवदत्त निकम, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अरुण गिरे, पैलवान गोरख सासवडे, पैलवान सुनील होळकर, उद्योजक संतोष बोत्रे, गजानन गुळवे, उद्योगपती डायमंडशेठ आदक, शिवाभाई आदक, माजी सरपंच संजय पोखरकर आणि चेअरमन दिलीप पोखरकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन विविध संस्था, आजी-माजी पदाधिकारी, विठ्ठल परिवार, शिवछत्रपती ग्रामविकास प्रतिष्ठान, जनसेवक ॲड. पै. अवधूत तात्या तानाजी राजगुडे तसेच वडगावपीर येथील ग्रामस्थांनी केले.

---

# कडाक्याच्या उन्हामुळे मेंढपाळ झालेत त्रस्त

### झाडांच्या सावलीत कळपांचा विसावा



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात सध्या कडाक्याच्या उन्हाचा तीव्र तडाखा जाणवत असून त्याचा मोठा परिणाम मेंढपाळांवर होत आहे. परिसरातील माळराने ओसाड पडल्याने शेळ्या-मेंढ्यांसाठी चारा जवळपास संपुष्टात आला आहे. त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याचीही टंचाई जाणवत असल्याने मेंढपाळांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे दिवसभर कळप चारण्यासाठी फिरणे कठीण झाले आहे. त्यामुळे मेंढपाळ सकाळी आणि संध्याकाळीच कळप चारण्याचा प्रयत्न करत आहेत. दुपारच्या कडक उन्हात मात्र कळपांना झाडांच्या सावलीत विसावा द्यावा लागत आहे. आंबेगाव तालुक्यातील नागापूर गावच्या हद्दीतील टाकी वस्ती परिसरात दुपारच्या वेळी शेळ्या-मेंढ्यांचे कळप बाभळीच्या झाडाखाली विसावलेले पाहायला मिळतात. परिसरात मोठ्या झाडांची संख्या कमी असल्याने उपलब्ध असलेल्या काही मोजक्या झाडांच्या सावलीतच मेंढपाळांना कळप थांबवावे लागतात. कडक उन्हामुळे थकलेल्या शेळ्या-मेंढ्या झाडाखाली शांतपणे विश्रांती घेताना दिसतात. मेंढपाळही उन्हापासून बचाव करण्यासाठी त्याच सावलीत थांबून कळपावर लक्ष ठेवताना दिसतात.

स्थानिक मेंढपाळ अनिल शेवाळे यांनी सांगितले की, मागील काही दिवसांपासून तापमानात मोठी वाढ झाली आहे. डोंगर-माळरानावर हिरवा चारा उरलेला नाही आणि पाण्याचे स्रोतही आटत चालले आहेत. त्यामुळे कळपांसाठी चारा आणि पाणी मिळवणे दिवसेंदिवस कठीण होत आहे.

---

# आंबेगाव तालुक्यात उन्हाळी बाजरीचे पीक फुलोऱ्यात



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात मोठ्या प्रमाणावर घेतले जाणारे उन्हाळी बाजरीचे पीक सध्या फुलोऱ्यात आले असून शेतकरी समाधान व्यक्त करत आहेत. अनुकूल हवामान आणि योग्य शेती नियोजनामुळे यंदा बाजरीचे उत्पादन चांगले होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तालुक्यातील नागापूर, थोरांदळे, पारगाव, वळती, शिंगवे आदी गावांमध्ये शेतकरी मोठ्या प्रमाणावर उन्हाळी बाजरीची लागवड करतात. रब्बी हंगामानंतर कमी पाण्यावर तग धरणारे पीक म्हणून बाजरीकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. उन्हाळी बाजरीच्या पिकाला तुलनेने कमी पाणी लागते. तसेच स्वच्छ व कोरडे हवामान मिळाल्यास पीक जोमाने वाढते. त्यामुळे पाण्याचा काही प्रमाणात ताण पडला तरी उत्पादनावर मोठा परिणाम होत नाही.

सध्या अनेक शेतांमध्ये बाजरीचे पीक फुलोऱ्यात आले असून कणसांची वाढही चांगली होत असल्याचे शेतकरी सांगत आहेत. पुढील काही आठवड्यांत कणसे भरण्याचा टप्पा सुरू होणार आहे. हवामान अनुकूल राहिल्यास यंदा उत्पादन समाधानकारक होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

बाजरी हा पौष्टिक अन्नधान्याचा प्रकार असल्याने बाजारात त्याला चांगली मागणी असते. बाजारभावातही वाढ होत असल्याने शेतकऱ्यांना या पिकातून आर्थिक फायदा होतो. घरगुती वापरासोबत उरलेली बाजरी बाजारात विक्रीसाठी पाठवली जाते. कमी खर्च, कमी पाणी आणि चांगला बाजारभाव यामुळे आंबेगाव तालुक्यात उन्हाळी बाजरीचे पीक शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

---

# गॅस टंचाईमुळे खेडमधील व्यावसायिक चिंतेत

### व्यापारी महासंघाचे तहसीलदारांना निवेदन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर** : व्यावसायिक एलपीजी गॅस सिलेंडरच्या पुरवठ्यात अडचणी निर्माण झाल्याने खेड तालुक्यातील व्यापारी व हॉटेल व्यावसायिक अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर राजगुरुनगर शहर व्यापारी महासंघाच्या वतीने तहसीलदार प्रशांत बेडसे यांना सोमवारी (दि. १६) निवेदन देत तातडीने गॅस पुरवठा सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सध्याच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाले आहेत. याचा थेट परिणाम राजगुरुनगरमधील हॉटेल व्यवसायावर होत आहे. गॅस उपलब्ध नसल्याने हॉटेल, ढाबे तसेच हातगाड्यांवर चालणारे लहान व्यवसाय बंद ठेवण्याची वेळ अनेक व्यावसायिकांवर आली आहे. गॅस टंचाईमुळे व्यावसायिकांसह त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कामगारांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिस्थिती अशीच राहिल्यास कोरोना काळातील परिस्थितीप्रमाणे कामगारांवर उपासमारीची वेळ येण्याची भीतीही व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी निवेदन स्वीकारत या प्रश्नाबाबत प्रशासनाकडून आवश्यक ती पावले उचलली जातील, असे आश्वासन दिले. गॅस पुरवठा सुरळीत करण्यासाठी संबंधित विभागांशी समन्वय साधून लवकरच पाठपुरावा करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. या वेळी राजगुरुनगर शहर व्यापारी महासंघाचे माणिक होरे, स्वानंद खेडकर, चंदन खारिवाल, बापू शेटे, दत्तात्रय वाघमारे, साहेबराव सातकर, विनय लोढा यांसह अनेक पदाधिकारी, सदस्य आणि हॉटेल व्यावसायिक उपस्थित होते.

---

### नदीपात्रात पाणी सोडण्याची शेतकऱ्यांची मागणी

# मीना नदीचे पात्र कोरडेठाक; शेतीवर पाण्याचा ताण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची असलेली मीना नदी सध्या पूर्णपणे कोरडी पडली असून त्यामुळे परिसरातील शेतीवर पाण्याचा तीव्र ताण निर्माण झाला आहे. नदीपात्रातील पाणीसाठा आटल्याने अनेक पिके होरपळू लागली असून विशेषतः चारा पिकांना मोठा फटका बसत आहे.

रांजणी, वळती, नागापूर आणि शिंगवे या गावांतील शेतकऱ्यांसाठी मीना नदी हे प्रमुख पाण्याचे स्रोत मानले जाते. नदीपात्रातील पाण्यावर तसेच येथे बांधण्यात आलेल्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांवर अनेक शेतकऱ्यांची शेती अवलंबून आहे. मात्र सध्या नदीपात्र पूर्णपणे कोरडे पडले असून बंधाऱ्यांमध्येही पाण्याचा साठा उरलेला नाही. त्यामुळे सिंचनासाठी पाणी उपलब्ध नसल्याने उभ्या पिकांवर संकट ओढवले आहे. सध्या रब्बी हंगामातील पिके अंतिम टप्प्यात असताना पाण्याअभावी उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. विशेषतः जनावरांसाठी घेतलेल्या हिरव्या चाऱ्याच्या पिकांना पाण्याची गरज असताना नदीपात्रातील पाणी आटल्याने ही पिके वाळू लागली आहेत. त्यामुळे पशुपालक शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. मीना नदीतील कोल्हापूर पद्धतीचे बंधारे भरलेले असतील तर परिसरातील विहिरी आणि बोअरवेलमधील पाणीपातळीही टिकून राहते. मात्र सध्या बंधारे कोरडे पडल्याने भूजल पातळीवरही परिणाम होत असल्याचे शेतकरी सांगत आहेत. त्यामुळे सिंचनासाठी पर्यायी साधनांचा वापर करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर जलसंपदा विभागाने तातडीने पाण्याचे आवर्तन सोडून मीना नदीपात्रात पाणी सोडावे, अशी मागणी रांजणी, वळती, नागापूर आणि शिंगवे परिसरातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. वेळेत पाणी सोडल्यास उभ्या पिकांना दिलासा मिळेल, अन्यथा मोठे नुकसान होण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

---

# जुन्या घरकुलांचा सर्वे करून दुरुस्तीसाठी निधी देण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्यातील मौजे पारगाव तर्फे अवसरी बु. ग्रामपंचायत हद्दीतील जुन्या घरकुलांचा सर्वे करून त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

पारगावचे माजी उपसरपंच विठ्ठल सिताराम ढोबळे यांनी घोडेगाव येथील गटविकास अधिकारी प्रमिला वाळूंज यांना निवेदन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, आंबेगाव तालुक्यातील तसेच पारगाव परिसरातील अनेक नागरिकांना शासनाच्या विविध घरकुल योजनांमधून घरकुलाचा लाभ मिळाला आहे. मात्र ही घरकुले आता जुनी झाल्यामुळे अनेक घरांच्या भिंतींना मोठे तडे गेले आहेत. काही घरकुलांची पडझडही झाली असून त्यामुळे अपघात होण्याची आणि जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

येत्या काही महिन्यांत पावसाळा सुरू होणार असल्याने वादळी वारे, मुसळधार पाऊस किंवा इतर नैसर्गिक आपत्तीच्या परिस्थितीत घरकुलांची स्थिती अधिक धोकादायक ठरू शकते. जुन्या घरकुलांचा तातडीने सर्वे करून दुरुस्तीसाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

## सारांश वृत्त

### अरुणाचलात वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या

**इटानगर :** अरुणाचल प्रदेश सरकारने पोलिस विभागात मोठे प्रशासकीय फेरबदल करत २७ वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि नव्या नियुक्त्या केल्या आहेत. या बदल्यांमध्ये भारतीय पोलिस सेवा (आयपीएस) तसेच राज्य पोलिस सेवा कॅडरमधील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. राज्याच्या गृह विभागाने जारी केलेल्या अधिकृत अधिसूचनेनुसार, पोलिस आस्थापना मंडळाच्या बैठकीनंतर राज्यपालांनी या बदल्यांना मंजुरी दिली.

### एनडीए सकारात्मक प्रचार करणार

**तिरुवनंतपुरम :** आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडी राज्यात सकारात्मक राजकारण मांडणार असल्याचे राजीव चंद्रशेखर यांनी सांगितले. ते सोमवारी पत्रकारांशी संवाद साधताना बोलत होते. भारतीय जनता पक्षचे प्रदेशाध्यक्ष असलेल्या राजीव चंद्रशेखर यांनी काँग्रेस, माकप तसेच इतर राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांमधून भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांचे स्वागत केले. राज्यातील राजकारणाला सकारात्मक दिशा देण्याचा पक्षाचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पुढील २३ दिवसांत पक्ष जनतेवर थेट परिणाम करणारे मुद्दे आहे. कोणत्याही आरोप-प्रत्यारोपांत गुंतण्याची पक्षाची भूमिका नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### दुग्धजन्य पदार्थात भेसळीप्रकरणी अटक

**भोपाळ :** भेसळयुक्त दुग्धजन्य पदार्थ विक्री प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने मध्य प्रदेशातील एका अन्न कंपनीच्या प्रवर्तकाला अटक केली आहे. या प्रकरणात आर्थिक गैरव्यवहार आणि मनी लॉंडरिंगच्या आरोपांची चौकशी सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. अंमलबजावणी संचालनालयाने किशन मोदी यांना १३ मार्च रोजी ताब्यात घेतले. ते जयश्री गायत्री फूड प्रोडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे मालक आणि व्यवस्थापकीय संचालक आहेत. त्यांच्या कंपनीवर भेसळयुक्त दुग्धजन्य पदार्थांची विक्री केल्याचा आरोप आहे.

## उड्डाणे तात्पुरती स्थगित, भारतीय विद्यार्थी अडकले

# दुबई विमानतळावर ड्रोन हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**दुबई/नवी दिल्ली :** इराणकडून करण्यात आलेल्या ड्रोन हल्ल्यामुळे जगातील सर्वाधिक व्यस्त विमानतळांपैकी एक असलेल्या दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील उड्डाणे तात्पुरती स्थगित करण्यात आली आहेत. या घटनेमुळे विमान वाहतुकीत मोठा विस्कळीतपणा निर्माण झाला असून अनेक उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत.

दुबई मीडिया ऑफिसने दिलेल्या माहितीनुसार, विमानतळ परिसरात झालेल्या ड्रोन घटनेत एका इंधन टाकीचे नुकसान झाले. मात्र या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून लागलेली आग तातडीने आटोक्यात आणण्यात आली आहे.

या घटनेनंतर एमिरेट्स आणि फ्लाय दुबई या विमान कंपन्यांनी काही उड्डाणे रद्द करण्याची घोषणा केली. इराणहून आर्मेनिया आणि दुबईमार्गे दिल्लीला जाणाऱ्या फ्लाय दुबईच्या कनेक्टिंग फ्लाइटमधून सुमारे ८० भारतीय वैद्यकीय विद्यार्थी प्रवास करणार होते. मात्र फ्लाइट रद्द झाल्याने हे विद्यार्थी दुबई विमानतळावर अडकले आहेत.

जम्मू-काश्मीर विद्यार्थी संघटनेचे संयोजक नझीर खेउहामी यांनी सांगितले की, ड्रोन हल्ल्यामुळे दिल्लीला जाणारी फ्लाइट एफझेड-४४१ उशिराने आली असून विमान वाहतूक मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली आहे. हे विमान आज सकाळी ९.५५ वाजता नवी दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचण्याचे नियोजित होते.

दरम्यान, एअर इंडिया समूहाने निवेदन जारी करून दुबईला जाणारी आणि तेथून येणारी सर्व उड्डाणे आजसाठी रद्द केल्याचे सांगितले आहे. प्रभावित प्रवाशांना अतिरिक्त शुल्काशिवाय पुढील तारखेला प्रवासासाठी पुनर्बुकिंग किंवा तिकीट रद्द करून पूर्ण परतावा मिळण्याची सुविधा देण्यात आली आहे.

एअर इंडिया एक्सप्रेसची अबू धाबी, रस अल खैमाह आणि शारजाह येथे जाणारी काही अतिरिक्त उड्डाणे मात्र सुरू राहतील, असे कंपनीने स्पष्ट केले आहे. तसेच इंडिगोनेही सुरू असलेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे दुबई मार्गावरील विमानसेवा मंगळवारपर्यंत प्रभावित राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

## १९ भारतीयांविरोधात यूएईमध्ये अटक आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** इराणमधील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर दिशाभूल करणारे युद्धाचे व्हिडिओ प्रसारित केल्याप्रकरणी संयुक्त अरब अमिराती प्रशासनाने कठोर कारवाई केली आहे. या प्रकरणात ३५ जणांविरुद्ध अटक आदेश जारी करण्यात आले असून त्यामध्ये १९ भारतीय नागरिकांचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे.

तपासानुसार काही व्यक्तींनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापरून तयार केलेले व्हिडिओ किंवा इतर ठिकाणचे जुने फुटेज वापरून ते सध्याच्या संघर्षाशी संबंधित असल्याचा दावा करत सोशल मीडियावर प्रसारित केले. या व्हिडिओंमध्ये क्षेपणास्त्र हल्ले, ड्रोन आक्रमणे आणि स्फोटांचे दृश्य दाखवून ते इराणशी संबंधित असल्याचे भासवण्यात आले होते. या दिशाभूल करणाऱ्या माहितीमुळे नागरिकांमध्ये भीती आणि गोंधळ निर्माण होण्याची शक्यता असल्याचे अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

यूएईच्या सायबर गुन्हे आणि अफवा प्रतिबंधक कायद्यांनुसार खोटी किंवा अप्रमाणित माहिती प्रसारित करणे हा गंभीर गुन्हा मानला जातो. त्यामुळे आरोपींना न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जावे लागणार असून दोषी ठरल्यास कारावास तसेच मोठा आर्थिक दंड होऊ शकतो. भारतीय दूतावास, अबूधाबीने यूएईमधील भारतीय नागरिकांना सावधगिरीचा इशारा दिला आहे. घटना स्थळांचे फोटो किंवा व्हिडिओ काढणे तसेच अप्रमाणित माहिती सोशल मीडियावर शेअर करणे टाळावे, तसेच स्थानिक कायद्यांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन दूतावासाने केले आहे.

## संघाचा विस्तार म्हणजे राष्ट्र विचारांचा विस्तार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विस्तार हा केवळ संघटनात्मक वाढ नसून तो राष्ट्रीय नीतिमत्तेच्या विस्ताराचे प्रतीक असल्याचे मत दत्तात्रेय होसाबळे यांनी व्यक्त केले. हरियाणातील समलखा येथे झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघच्या तीन दिवसीय अखिल भारतीय प्रतिनिधी सभेच्या शेवटच्या दिवशी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना ही भूमिका मांडली.

देशातील नागरिकांनी वसाहतवादी मानसिकतेतून मुक्त होण्याची गरज असल्यावरही त्यांनी भर दिला. भारतीय विचारसरणी ही जगाच्या कल्याणाचा दृष्टिकोन मांडणारी असल्याचे ते म्हणाले. या बैठकीत समाजातील “सज्जन शक्ती” अधिकाधिक प्रमाणात राष्ट्रीय हितासाठी एकत्र आणण्याचा संकल्प करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

होसाबळे यांनी सांगितले की, गेल्या वर्षभरात संघाच्या कार्यात मोठी वाढ झाली आहे. देशभरातील संघ शाखांची संख्या आता ८८ हजारांहून अधिक झाली असून सुमारे सहा हजार शाखांची वाढ झाली आहे. तसेच शाखा आयोजित होणाऱ्या ठिकाणांची संख्या ५५ हजारांपेक्षा जास्त झाली आहे. साप्ताहिक ‘मिलन’ आणि ‘मंडळी’ या स्वरूपातील बैठकींची संख्याही वाढल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संघाच्या शाखा आता अंदमान बेटे, अरुणाचल प्रदेश, लेह तसेच दुर्गम आदिवासी भागांमध्येही सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. संघाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर आयोजित कार्यक्रमांतूनही हा विस्तार दिसून येत असल्याचे ते म्हणाले.

संघ समाजातील जीवनमान आणि चारित्र्य उंचावण्यासाठी कार्य करत असल्याचे सांगताना त्यांनी ‘पंच परिवर्तन’ या संकल्पनेचा उल्लेख केला. हिंदुत्व ही केवळ विचारसरणी नसून ती जीवनपद्धती आहे आणि त्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## पश्चिम आशिया संघर्ष; ५,५००हून अधिक उड्डाणे रद्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षामुळे हवाई वाहतुकीवर मोठा परिणाम झाला असून भारतीय आणि परदेशी विमान कंपन्यांनी मिळून ५,५००हून अधिक उड्डाणे रद्द केली आहेत. केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी सोमवारी राज्यसभेत ही माहिती दिली.

मंत्र्यांनी सांगितले की, पश्चिम आशियातील काही देशांचे हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे भारतीय विमान कंपन्यांनी आतापर्यंत ४,३३५ उड्डाणे रद्द केली आहेत. त्याचबरोबर परदेशी विमान कंपन्यांनी १,१८७ उड्डाणे रद्द केली आहेत. अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील वाढत्या तणावामुळे या प्रदेशातील हवाई वाहतुकीत मोठा अडथळा निर्माण झाला आहे. प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान बोलताना नायडू यांनी स्पष्ट केले की, विमान कंपन्यांच्या आणि प्रवाशांच्या सुरक्षेला सरकारकडून सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे. हवाई क्षेत्र सुरक्षित नसताना त्या भागात विमानसेवा सुरू ठेवण्याचे कोणतेही कारण नसल्याचे त्यांनी सांगितले.

विमान वाहतूक मंत्रालय आणि नागरी विमान वाहतूक महासंचालनालय संबंधित देशांच्या नियामक संस्थांशी सतत संपर्कात असल्याची माहितीही त्यांनी दिली. परिस्थिती अनुकूल असलेल्या मार्गांवरच उड्डाणे सुरू ठेवण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संकटाच्या काळातही २ लाख १९ हजार ७८० प्रवाशांनी विमान प्रवास केला आहे. काही हवाई मार्ग अद्याप बंद असले तरी प्रवाशांना शक्य तितकी सुविधा देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. हवाई मार्ग पूर्णपणे सुरक्षित झाल्यानंतरच नियमित विमानसेवा सुरळीतपणे सुरू होऊ शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## आयोगाच्या निर्णयावर तृणमूलचा निषेध; सभात्याग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर काही तासांतच राज्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये केलेल्या बदलांच्या निर्णयावरून तृणमूल काँग्रेसने राज्यसभेत जोरदार निषेध नोंदवला. मुख्य सचिव नंदिनी चक्रवर्ती यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांना पदावरून हटवण्याच्या निर्णयाच्या निषेधार्थ तृणमूल काँग्रेसच्या सदस्यांनी सोमवारी राज्यसभेतून सभात्याग केला.

राज्यसभेत शून्य प्रहरापूर्वी हा मुद्दा उपस्थित करत तृणमूल काँग्रेसचे सदस्य डेरेक ओ'ब्रायन यांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयावर टीका केली. त्यांनी सांगितले की, मध्यरात्रीच्या सुमारास मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि गृह सचिव यांना पदावरून हटवण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याविरोधात पक्ष निषेध नोंदवत आहे. संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी या आरोपांना उत्तर देताना निवडणूक आयोग हा संवैधानिक अधिकार असलेला स्वतंत्र संस्थात्मक घटक असल्याचे स्पष्ट केले. अशा संस्थांच्या निर्णयांवर सभागृहात प्रश्न उपस्थित करणे योग्य नसल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच तृणमूल काँग्रेस आणि काँग्रेस पक्ष संवैधानिक संस्थांवर वारंवार टीका करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालचे मुख्य सचिव नंदिनी चक्रवर्ती आणि गृह सचिव जगदीश प्रसाद मीणा यांना त्यांच्या पदावरून हटवले. त्यानंतर दुष्यंत नारियाला यांची राज्याचे नवीन मुख्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली.

तसेच संघमित्रा घोष यांची गृह व हिल अफेयर्स विभागाच्या प्रधान सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

## मध्य प्रदेशात १,३५७ सिलिंडर जप्त

# सिलिंडर काळाबाजारावर कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भोपाळ :** एलपीजी सिलिंडरच्या काळाबाजार आणि साठेबाजीविरोधात मध्य प्रदेश सरकारने मोठी कारवाई केली असून राज्यभरात छापेमारी करून आतापर्यंत १,३५७ सिलिंडर जप्त करण्यात आले आहेत. या प्रकरणी आठ गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत.

राज्य सरकारच्या निर्देशानुसार अन्न व नागरी पुरवठा विभाग, जिल्हा प्रशासन आणि पोलिसांच्या संयुक्त पथकांनी गेल्या काही दिवसांत राज्यभरात १,०२५ ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत मोठ्या प्रमाणावर एलपीजी सिलिंडर जप्त करण्यात आले असून काळाबाजारात सहभागी असलेल्या व्यक्तींविरोधात कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

पेट्रोल, डिझेल, सीएनजी, पीएनजी आणि घरगुती एलपीजीच्या पुरवठ्याबाबत तेल कंपन्यांशी समन्वय साधण्यासाठी राज्य स्तरावर सहा सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती राज्यातील व्यावसायिक आणि घरगुती गॅस सिलिंडरचा अखंड पुरवठा सुरू राहील यासाठी देखरेख ठेवणार आहे.

राज्य सरकारने पीएनजीचा वापर करणाऱ्या ग्राहकांना अनावश्यकपणे एलपीजी सिलिंडर बुकिंग करू नये, असे आवाहन केले आहे. तसेच पेट्रोल, डिझेल, सीएनजी, पीएनजी आणि घरगुती गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा नियमित सुरू राहील, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

गॅस एजन्सींचे कामकाज, सिलिंडर वितरणाची वेळेवर अंमलबजावणी आणि ग्राहकांच्या तक्रारींचा आढावा सध्या घेतला जात आहे. वितरण व्यवस्थेत कोणतीही अनियमितता आढळल्यास तातडीने कारवाई करण्याचे निर्देश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. राज्याचे तेल कंपन्यांसाठी नोडल अधिकारी अजय श्रीवास्तव यांनी सांगितले की, राज्यातील ११ बॉटलिंग प्लांट आणि वितरकांच्या गोदामांमध्ये गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. घरगुती ग्राहकांनी शेवटच्या बुकिंगनंतर किमान २५ दिवसांनीच पुढील सिलिंडर बुक करावे, असेही प्रशासनाने आवाहन केले आहे. तसेच व्यावसायिक ग्राहकांनी इंधनाचा विवेकी वापर करावा आणि पर्यायी इंधन स्रोतांचा विचार करावा, असा सल्ला देण्यात आला आहे.

राज्याच्या अतिरिक्त मुख्य सचिव (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) रश्मी अरुण शमी यांनी घरगुती ग्राहकांना वेळेवर गॅस उपलब्ध करून देण्यासाठी आणि वितरण व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी संबंधित विभागांना आवश्यक निर्देश दिले आहेत.

## बंगाल निवडणुकीआधी मोठे प्रशासकीय फेरबदल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीची घोषणा होताच भारतीय निवडणूक आयोगाने राज्यातील उच्च प्रशासकीय आणि पोलिस पदांवर मोठे फेरबदल करण्याचे आदेश दिले आहेत. आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर काही तासांतच मुख्य सचिव, गृहसचिव आणि वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या.

निवडणूक आयोगाने राज्याच्या मुख्य सचिवपदी असलेल्या नंदिनी चक्रवर्ती यांची बदली करून १९९३ बॅचचे आयएएस अधिकारी दुष्यंत नारियाला यांची नियुक्ती केली आहे. तसेच गृहसचिव जगदीश प्रसाद मीणा यांच्या जागी १९९७ बॅचच्या आयएएस अधिकारी संघमित्रा घोष यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघमित्रा घोष या पश्चिम बंगालच्या पहिल्या महिला गृहसचिव ठरल्या आहेत. आयोगाचे सचिव सुरजीत कुमार मिश्रा यांनी रविवारी उशिरा जारी केलेल्या पत्राद्वारे हे आदेश देण्यात आले. तसेच नंदिनी चक्रवर्ती आणि जगदीश प्रसाद मीणा यांना विधानसभा निवडणुका पूर्ण होईपर्यंत निवडणुकीशी संबंधित कोणतीही जबाबदारी देऊ नये, असे निर्देशही देण्यात आले आहेत.

याशिवाय राज्याचे पोलिस महासंचालक पीयूष पांडे आणि कोलकाता पोलिस आयुक्त सुप्रतिम सरकार यांच्यासह काही वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांचीही बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी सिद्धनाथ गुप्ता यांची कार्यवाहक पोलिस महासंचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली असून अजय कुमार नंद यांची कोलकाता पोलिस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच नटराजन रमेश बाबू यांची सुधारात्मक सेवा महासंचालक म्हणून, अजय मुकुंद रानडे यांची अतिरिक्त महासंचालक व कायदा-सुव्यवस्था प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

निवडणूक आयोगाने राज्य सरकारला या आदेशांची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले असून सोमवारी दुपारी ३ वाजेपर्यंत अनुपालन अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.

## चोरीला गेलेले दागिने कुरिअरने परत

**तिरुपती :** येथे एका लग्नसमारंभात चोरीला गेलेले सोन्याचे दागिने नंतर कुरिअरद्वारे परत करण्यात आल्याची अनोखी घटना समोर आली आहे. याबाबत पोलिसांनी सांगितले की, चोरी झाल्यानंतर सुमारे वीस दिवसांनी हे दागिने संबंधिताच्या घराच्या दाराशी कुरिअरने ठेवण्यात आले. तिरुपतीतील एका जोडप्याने सुमारे २० दिवसांपूर्वी नायडूपेटा येथील खासगी सभागृहात आयोजित लग्न समारंभाला हजेरी लावली होती. त्यावेळी त्यांच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी झाली होती.

## नव्या टॅरिफ रचनेनंतर व्यापार करारावर स्वाक्षरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** नव्या जागतिक टॅरिफ रचनेची अंमलबजावणी झाल्यानंतर भारत आणि अमेरिका यांच्यातील प्रस्तावित व्यापार करारावर औपचारिक स्वाक्षरी करण्यात येईल, अशी माहिती वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सोमवारी दिली.

अग्रवाल यांच्या मते, वॉशिंग्टनकडून जागतिक कर दरांची पुनर्रचना पूर्ण झाल्यानंतर हा करार अंतिम केला जाईल. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लागू केलेल्या परस्पर करांना अवैध ठरवल्यानंतर या प्रक्रियेला नवे वळण मिळाले आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतर काही तासांतच ट्रम्प यांनी काही कर उपाय समाप्त करणाऱ्या कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली आणि अमेरिकेत येणाऱ्या वस्तूंवर १० टक्के तात्पुरता आयात अधिभार लागू करण्याची घोषणा केली. नंतर हा अधिभार १५ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला. भारत आणि अमेरिका सध्या प्रस्तावित व्यापार कराराचा आराखडा अंतिम करण्यासाठी चर्चेत गुंतले आहेत. या चर्चेनंतर औपचारिक करारावर स्वाक्षरी होईल, असे मानले जाते.

अग्रवाल यांनी सांगितले की, अमेरिका भारतासाठी सर्वात मोठे निर्यात गंतव्यस्थान आहे, तसेच जागतिक व्यापारातील भागीदारी वाढवण्यासाठी भारत विविध देश आणि प्रादेशिक गटांसोबत सहा मुक्त व्यापार करारांवरही (एफटीए) चर्चा करत आहे.

## योजना, अस्मिता आणि भाजपचे कडवे आव्हान

# बंगाल निवडणुकीत पुन्हा ममता बॅनर्जी यांची परीक्षा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला असून २३ आणि २९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे, तर ४ मे रोजी मतमोजणी होऊन नवीन सरकार स्थापन होणार आहे. सत्ताधारी ममता बॅनर्जी सलग चौथ्यांदा सत्ता टिकवण्याच्या प्रयत्नात आहेत, तर भारतीय जनता पक्ष २०२१ पेक्षा अधिक चांगली कामगिरी करण्याचा दावा करत आहे.

ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली तृणमूल काँग्रेसने २०११ मध्ये ऐतिहासिक विजय मिळवत तब्बल ३४ वर्षे सत्तेत असलेल्या डाव्या आघाडीचा पराभव केला आणि राज्यात सत्ता स्थापली. त्यानंतर २०१६ आणि २०२१ या दोन निवडणुकांतही तृणमूल काँग्रेसने विजय मिळवत सलग तीन कार्यकाळ पूर्ण केले आहेत. त्यामुळे आता २०२६ च्या निवडणुकीत ममता बॅनर्जी चौथ्यांदा सत्ता राखतात का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

२०२१ च्या निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने मोठा विजय मिळवला असला तरी ममता बॅनर्जी यांना नंदीग्राम मतदारसंघात सुवेंदू अधिकारी यांच्याकडून पराभव पत्करावा लागला होता. तरीही राज्यभर मिळालेल्या बहुमतामुळे त्यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतली.

राजकीय विश्लेषकांच्या मते, तृणमूल काँग्रेसची ताकद टिकून राहण्यामागे सरकारच्या काही कल्याणकारी योजना महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यामध्ये लक्ष्मी भंडार, स्वास्थ्य साथी आणि युवा साथी या योजनांचा समावेश आहे. या योजनांमुळे महिला, तरुण आणि ज्येष्ठ नागरिक अशा विविध सामाजिक घटकांपर्यंत सरकार पोहोचले आहे. याशिवाय बंगाली अस्मितेचा मुद्दा मांडण्यात ममता बॅनर्जी आघाडीवर राहिल्या आहेत. अनेकदा त्यांनी दिल्ली विरुद्ध बंगाल अशी राजकीय चौकट उभी करत प्रादेशिक भावनांना साद घालण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे राज्यातील मोठा मतदारवर्ग अजूनही त्यांच्या पाठीशी उभा असल्याचे दिसते.

दुसरीकडे भारतीय जनता पक्ष शिक्षक भरती घोटाळा, आर. जी. कर प्रकरण तसेच बांगलादेशी घुसखोरीसारखे मुद्दे पुढे करून सत्ताधाऱ्यांवर टीका करत आहे. मात्र संपूर्ण राज्यभर प्रभाव टाकू शकणाऱ्या नेतृत्वाच्या अभावाची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालमध्ये होणारी विधानसभा निवडणूक ही केवळ सत्ता टिकवण्याची लढत नसून ममता बॅनर्जींच्या नेतृत्वावरील जनतेचा पुन्हा एकदा घेतला जाणारा कौल ठरणार आहे.